# केजरीवाल, बेदी, भूषण आणि सिसोदिया यांची हजारे निंदा करीत असल्याची व्हिडिओ प्रसिद्ध करणार

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – अण्णा हजारे यांचा ब्लॉग लिहिणारे राजू परुळेकर यांच्यावर बेछूट आरोप करणे अण्णा हजारे व त्यांच्या टीमला चांगले भोवणार आहे. नाराज झालेल्या परुळेकर यांनी कोर समिती भंग करण्याचे अण्णा हजारे यांचे पत्र ब्लॉगवर टाकून प्रसिद्ध केल्यानंतर आता अरविंद केजरीवाल, किरण बेदी, प्रशांत भूषण आणि मनिष सिसोदिया यांचा अण्णा हजारे खास मराठी भाषेत उद्धार करीत असतानाचा व्हिडिओ आपण लवकरच प्रसिद्ध करणार असल्याची धमकी परुळेकर यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन दिली. त्यामुळे अण्णा हजारे व त्यांची टीम चांगलीच हादरली आहे. परुळेकर यांची समजूत काढण्याची जबाबदारी अण्णा हजारे यांनी त्यांचे निकटवर्तीय संतोष पठारे यांच्यावर सोपविली आहे.



## परुळेकर यांची धमकी

अण्णा हजारे यांनी मौनव्रत धारण केल्यानंतर त्यांचे मते जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी एक ब्लॉग तयार करण्यात आला होता. हा ब्लॉग लिहिण्याचे काम पत्रकार राजू परुळेकर यांच्यावर सोपविण्यात आले होते. कोर समितीत पुनर्रचना करण्याचे पत्र २३ ऑक्टोबर रोजी अण्णांनी दिले होते. त्यानुसार ब्लॉगवर कोर समितीत पुनर्रचना होणार असल्याचे परुळेकर यांनी ब्लॉगवर लिहिले. यामुळे टीम अण्णातील सदस्य अरविंद केजरीवाल, किरण बेदी, प्रशांत भूषण यांनी राजू परुळेकर हे एका केंद्रीय मंत्र्यांचे एजंट असल्याचा आरोप केला. त्यामुळे परुळेकर संतप्त झाले. अण्णा हजारे यांनी दिल्लीतील पत्रकार परिषदेत कोर समितीत पुनर्रचना होणार नसल्याचे जाहीर केले. राजू परुळेकर यांचे काम व्यवस्थित नसल्याने त्यांच्याकडून हे काम काढून घेणार असल्याचेही हजारे म्हणाले. त्यामुळे परुळेकर हे नाराज झाले.

परुळेकर यांनी रविवारी कोर समितीत पुनर्रचना करणार असल्याचे अण्णा हजारे यांचे पत्र ब्लॉगवर प्रसिद्ध करून त्यांना खोटे पाडले. केजरीवाल, किरण बेदी, प्रशांत भूषण आणि सिसोदिया हे अण्णा हजारे यांना मान देत नाहीत. त्यांचे ऐकत नाहीत. आपलेच म्हणणे खरे करून दाखवतात. त्यामुळे अण्णा त्यांच्यावर चिडले असून त्यांना ते कोर समितीतून काढणार असल्याचे परुळेकर यांनी जाहीर केले होते.

अण्णा हजारे हे केजरीवाल, बेदी, भूषण आणि सिसोदिया यांच्यावर संतापलेले आहेत. हजारे यांनी अनेकवेळा त्या चौघांची निंदा केली आहे. त्याची व्हिडिओ क्लिप आपल्याकडे आहे. ती आपण लवकरच प्रसिद्ध करू, असे परुळेकर यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे अण्णा हजारे व त्यांची टीम हादरली आहे. परुळेकर यांनी ही व्हिडिओ क्लिप जाहीर करू नये यासाठी त्यांना पटविण्याचे काम हजारे यांनी त्यांचे निकटवर्तीय संतोष पठारे यांच्यावर सोपविले आहे.